10-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 09-03-2025 23:44 Page 1



तीन खासगी बसेसचे परवाने निलंबीत

पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

www.dainikherald.com

# दैनिक हेराल्ड




गणपत पार्सेकर शिक्षण महाविद्यालयात वार्षिक क्रीडा दिन साजरा

पान ४ वर

वेर्णा, सोमवार, १० मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 187 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 10 March 2025 | Pages 4 | ₹ 4

# गोव्यातील नद्यांचे प्रदूषण गंभीर!

## कॅसिनो आणि खाणकामापासून नद्यांना वाचवण्याची गरज

■ टीम दैनिक हेराल्ड :

**मडगाव, दि. ९ : गोव्याच्या नद्यांना कॅसिनो, खाणकाम आणि प्रदूषण यांसारख्या गंभीर धोक्यांपासून वाचवण्याची तातडीची गरज आहे, असे मत नॅशनल फेडरेशन ऑफ स्मॉल-स्केल फिशवर्कर्स या संस्थेने व्यक्त केले आहे. नीती आयोगाच्या स्वयंसेवी राष्ट्रीय आढावा परिषदेत बोलताना सरचिटणीस आणि ऑल गोवा स्मॉल स्केल रिस्पॉन्सिबल फिशरीज युनियन चे प्रतिनिधी डॉ. सेबास्टियाओ रॉड्रिग्ज यांनी गोव्याच्या जलसंपत्तीवर उद्भवणाऱ्या संकटांविषयी सखोल विश्लेषण सादर केले आणि त्वरित उपाययोजनांची मागणी केली.**

रॉड्रिग्ज यांच्या मते, एकेकाळी संपन्न मत्स्यसंपत्ती असलेली मांडवी नदी आता तरंगत्या कॅसिनोंच्या प्रभावामुळे जुगाराच्या केंद्रात रूपांतरित झाली आहे. इंजिनमधून होणाऱ्या तीव्र आवाजामुळे आणि तेलगळतीमुळे सागरी जीवसृष्टी धोक्यात आली आहे. त्यामुळे नदीतील मासेमारी व्यवसायावर मोठा परिणाम झाला आहे. त्यांनी नदीतील सर्व कॅसिनो जहाजे तातडीने हटवण्याची व साचलेला कचरा साफ करण्याची मागणी केली. झुआरी नदीला वेगळ्या प्रकारच्या धोक्याचा सामना करावा लागत आहे. सुमारे दोन लाख चौरस मीटर क्षेत्र मरीना विकासासाठी खाजगी कंपन्यांना भाडेतत्त्वावर देण्यात आले आहे. मुरगाव पोर्ट ट्रस्टने २०१० मध्ये ३० वर्षांसाठी हे करार केले. मात्र स्थानिक मासेमार समुदायांच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष करण्यात आले. रॉड्रिग्ज यांनी या करारांची त्वरित पुनरिक्षण करून त्यावर बंदी घालण्याची शिफारस केली.

सांडपाण्यामुळे साळ नदीतील प्रदूषण वाढत असून, शापोरा, तेरेखोल, मांडवी आणि झुआरी नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाळू उत्खनन सुरू आहे. यामुळे माशांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होत आहेत. रॉड्रिग्ज यांनी नद्यांमधील अवैध वाळू उत्खनन तातडीने थांबवण्याची आणि साल नदीच्या पुनरुज्जीवनासाठी स्वतंत्र कायदेशीर संस्था स्थापन करण्याची मागणी केली. खुल्या पद्धतीने सुरू असलेल्या लोहखनिज उत्खननामुळे कुडणे, डिचोली आणि कुशावती नद्यांमध्ये गाळ साचत आहे, परिणामी पूरस्थिती निर्माण होत आहे. यावर उपाय म्हणून या नद्यांच्या पाणलोट क्षेत्रातील सर्व खाणी तत्काळ बंद करण्याचा सल्ला त्यांनी दिला.

राष्ट्रीय जलमार्ग कायदा २०१७ आणि प्रमुख बंदरे प्राधिकरण कायदा २०२१ यामुळे मासेमारांच्या पारंपरिक अधिकारांवर परिणाम झाला आहे. गोव्यातील सहा नद्यांना राष्ट्रीय जलमार्ग म्हणून घोषित करण्यात आले असून, यामुळे भारतीय अंतर्देशीय जलमार्ग

पान २ ▶

## चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ : भारताचा विजयी महाल



१. भारताचा दैदिप्यमान विजय – आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात भारताने न्यूझीलंडचा चार गडी राखून पराभव करत विजेतेपदावर मोहोर उमटवली.
२. विजयासाठी २५२ धावांचे लक्ष्य – न्यूझीलंडने भारतासमोर २५२ धावांचे लक्ष्य ठेवले, जे टीम इंडियाने ४९ षटकांत सहा विकेट्स गमावून सहज पूर्ण केले.
३. रोहित शर्माची कप्तानी खेळी– कर्णधार रोहित शर्माने ७६ धावांची मोलाची खेळी करत भारताच्या विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.
४. तिसऱ्यांदा चॅम्पियन्स ट्रॉफी विजेतेपद– भारताने याआधी २००२ आणि २०१३ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली होती; आता तिसऱ्यांदा हे प्रतिष्ठित विजेतेपद पटकावले.
५. कुलदीप यादवचा निर्णायक प्रभाव – कुलदीप यादवने शानदार फिरकी गोलंदाजी करत रचिन रवींद्र आणि केन विल्यमसन यांना बाद करून न्यूझीलंडच्या डावाला खिंडार पाडले.
६. वरुण चक्रवर्तीचा प्रारंभीचा फटका – न्यूझीलंडच्या डावाच्या सुरुवातीलाच वरुण चक्रवर्तीने विल यंगला एलबीडब्ल्यू बाद करत संघाला पहिला धक्का दिला.
७. डॅरेल मिशेलचा संघर्ष व्यर्थ – न्यूझीलंडसाठी डॅरेल मिशेलने डाव सावरण्याचा प्रयत्न केला, परंतु भारतीय गोलंदाजांनी सातत्यपूर्ण आक्रमण राखले.
८. मायकेल ब्रेसवेलची अर्धशतकी खेळी – ब्रेसवेलने ४० चेंडूत ५३ धावांची नाबाद खेळी करत न्यूझीलंडच्या धावसंख्येत मोलाची भर घातली.
९. भारताचा अपराजित प्रवास – संपूर्ण चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारताने एकही सामना गमावला नाही, गट 'अ'मधील न्यूझीलंडवरही भारताने विजय मिळवला होता.
१०. अंतिम फेरीतील प्रतिस्पर्धी – भारताने उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियाचा पराभव केला, तर न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेवर विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

## निवडक

### उपराष्ट्रपती धनखड यांची प्रकृती बिघडली

नवी दिल्ली, दि. ९ : उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांना रविवारी पहाटे अस्वस्थ वाटू लागल्याने आणि छातीत दुखू लागल्याने दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याची एएनआयने सूत्रांच्या हवाल्याने या संदर्भात सोशल मीडियावर पोस्ट केली आहे.
७३ वर्षीय धनखड यांना पहाटे २ वाजता रुग्णालयात नेण्यात आले आणि एम्समधील कार्डिओलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. राजीव नारंग यांच्या देखरेखीखाली क्रिटिकल केअर युनिटमध्ये दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती सध्या स्थिर असून डॉक्टरांच्या निरिक्षणाखाली आहेत.
स्वारगेट एसटी स्थानकातील गस्त कागदावरच प्रवाशाकडील लॅपटॉप चोरीला डॉक्टर आहेत की खाटीक! कोमात असल्याचं सांगून हॉस्पिटलनं उकळले लाखो रुपये; सत्य कळताच रुग्ण खउण मधून पळाला. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही एम्स रुग्णालयात दाखल असलेल्या जगदीप धनखड यांची भेट घेतली.

--------------

### तेलंगणा दुर्घटना ; १६व्या दिवशी सापडा मृतदेह

**हैद्राबाद, दि. ९ : तेलंगणा बोगदा दुर्घटनेच्या १६ व्या दिवशी बचाव पथकाला पहिला मृतदेह सापडला आहे. शरीर मशीनमध्ये अडकले आहे. मृतदेह बाहेर काढण्यासाठी मशीन कापण्याचे काम सुरू आहे. ७ मार्च रोजी, स्निफर कुत्र्यांना बोगद्यात नेण्यात आले.
बचाव अधिकाऱ्याने सांगितले की, मशीनमध्ये अडकलेल्या मृतदेहाचे फक्त हात दिसत होते. काल, राज्याचे पाटबंधारे मंत्री उत्तम कुमार रेड्डी म्हणाले होते की, स्निफर कुत्र्यांना एका विशिष्ट ठिकाणी तीव्र वास येत असल्याचे आढळले. तिथे तीन लोक उपस्थित असल्याचे उघड झाले आहे.
यानंतर तिथे साचलेला कचरा काढण्याचे काम सुरू होते. तथापि, मृतदेह त्याच ठिकाणी सापडला की दुसऱ्या ठिकाणाहून, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. बचावकार्याला गती देण्यासाठी रोबोट्सचाही वापर केला जात आहे. ५२५ कामगार मजुरांच्या शोधात गुंतले आहेत.
राज्यातील नागरकुरनूल येथील श्रीशैलम लेफ्ट बँक कॅनाल (एसएलबीसी) बोगद्याचा एक भाग २२ फेब्रुवारी रोजी कोसळला होता. यामुळे आत काम करणारे ८ कामगार अडकले.**

--------------

### अमेरिकेत पुन्हा एकदा हिंदू मंदिराची विटंबना

**वॉशिंगटन, दि. ९** : अमेरिकेत पुन्हा एकदा हिंदू मंदिराची विटंबना करण्यात आली आहे. कॅलिफोर्नियात चिनो हिल्स येथे असलेल्या श्री स्वामीनारायण मंदिरात या मंदिराची विटंबना करण्यात आली. याविरोधात आता परराष्ट्रमंत्रालयानेही निषेध नोंदवला असून स्थानिक अधिकाऱ्यांना कठोर कारवाई आवाहन करण्यात आल्याचं परराष्ट्र मंत्रालयाने कळवलं आहे.
शनिवारी बोचासनवासी अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण संस्थेने (बीएपीएस) याबाबत सोशल मीडियावर एक निवेदन जारी केले होते. त्यात त्यांनी म्हटलंय की, चिनो हिल्समध्ये असलेल्या श्री स्वामीनारायण मंदिराची विटंबना झाली आहे. तसेच, या घटनेनंतर बी-पीएस पब्लिक अफेयर्स टीमनेही याविरोधात निषेध नोंदवला. त्यांनी पोस्टमध्ये म्हटलंय की, सीएच्या चिनो हिल्समध्ये झालेल्या आणखी एका मंदिराच्या अपवित्रतेच्या पार्श्वभूमीवर, हिंदू समुदाय द्वेषाविरुद्ध ठाम आहे. चिनो हिल्स आणि दक्षिण कॅलिफोर्नियामधील समुदायासोबत,

### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५ .७७ ↑ (२३१.१६ )
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# टीडीपी खासदाराची वादग्रस्त घोषणा

विजयनगरम, दि. ९ :

आंध्र प्रदेशातील तेलुगू देसम पक्षाचे (टीडीपी) खासदार कालिसेट्टी अप्पलनायडू यांनी तिसऱ्या मुलाला जन्म देणाऱ्या महिलांसाठी आर्थिक प्रोत्साहन देण्याची घोषणा केल्याने राज्यात खळबळ उडाली आहे. त्यांनी जाहीर केले की, जर महिलेने तिसरे अपत्य जन्माला घातले, तर तिला त्यांच्या पगारातून ५०,००० रुपये दिले जातील. तसेच, जर मूल मुलगा असेल तर गाय भेट दिली जाईल. आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित एका कार्यक्रमात अप्पलनायडू यांनी ही घोषणा केली. त्यांच्या या वक्तव्यावर विविध स्तरांवरून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

राज्यातील मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांच्यासह वरिष्ठ टीडीपी नेते कमी होत असलेल्या तरुण लोकसंख्येच्या प्रश्नावर सातत्याने भाष्य करत आहेत. याच पार्श्वभूमीवर अप्पलनायडू यांनी लोकसंख्या वाढीस चालना देण्यासाठी हे पाऊल उचलल्याचे सांगितले. याबाबत

**▶ तिसऱ्या अपत्यासाठी विशेष प्रोत्साहन**

माध्यमांच्या प्रश्नांना उत्तर देताना अप्पलनायडू म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी लोकसंख्या वाढीसंबंधी केलेल्या आवाहनानंतर त्यानी निर्णय घेतला आहे. आम्ही महिलांना अधिक अपत्य जन्माला घालण्यास प्रोत्साहित करत आहोत असे ते म्हणाले

मुख्यमंत्री नायडू यांनी प्रकाशम जिल्ह्यातील मारकापूर येथे झालेल्या एका कार्यक्रमात सरकारी महिला कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाची घोषणा केली. त्यांनी सांगितले की, बाळंतपणाच्या काळात कर्मचाऱ्यांना कितीही मुले असली तरी प्रसूती रजा मंजूर केली जाईल. यापूर्वी फक्त दोन अपत्यांसाठीच वेतनासह प्रसूती रजा मिळत होती.

गृहमंत्री व्ही. अनिता यांनीही महिला पोलिस कर्मचाऱ्यांसाठी ही सुविधा लागू करण्यात येणार

पान २ ▶

# बालिकेच्या हत्येचे गूढ कायम ; परिसरात संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ९** : उसगाव येथे ६ मार्च रोजी एका जोडप्याने आपल्याला मूल होण्यासाठी केलेल्या चार वर्षीय मुलीच्या निर्घृण हत्येचे गूढ अजूनही पूर्णपणे उकललेले नाही. पोलिसांनी या प्रकरणात काळ्या जादूचा कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले असले, तरीही अनेक स्थानिक रहिवाशांना हा गुन्हा अजूनही रहस्यमय वाटत आहे. काहींच्या मते, हा खून गर्भधारणेसाठी करण्यात आला असावा. या घटनेनंतर अनेक स्थानिकांनी पोलिसांकडे सखोल चौकशीची मागणी केली असून, फोंडा पोलिस ठाण्यासमोर लोकांनी मोठ्या संख्येने निदर्शने केली.

उसगावच्या पंचसदस्य मनीषा उसगावकर यांनी वक्तव्य करताना सांगितले की, जर कोणत्याही मांत्रिकाने या जोडप्याला असे कृत्य करण्यास प्रवृत्त केले असेल, तर अशा मांत्रिकावरही कठोर कारवाई करावी आणि त्याला तुरुंगात टाकले पाहिजे. तसेच, गावातील सर्व बाजूंनी तपास होण्याची मागणीही त्यांनी केली.

उसगाव गांजेचे सरपंच रामनाथ डांगी यांनीही या क्रूर कृत्याचा निषेध व्यक्त करताना सांगितले की आजच्या वैज्ञानिक युगात अशा प्रकारच्या अंधश्रद्धांवर विश्वास ठेवणे धोकादायक आहे. विशेषतः उसगाव परिसरात मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित लोक स्थायिक झाले असल्याने, जागरूकता आणि सुरक्षा उपायांची गरज आहे, असे सांगितले.

गेल्या दोन दशकांत नोकरीच्या संधींमुळे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होऊन उसगाव आणि तिस्क परिसरात देशभरातील विविध राज्यांतील नागरिक स्थायिक झाले आहेत. २०१२ मध्ये खाणकाम बंद झाल्यानंतरही या भागात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक प्रकल्प आणि व्यवसाय स्थापन झाल्याने स्थलांतरित लोकसंख्या वाढत गेली. आज उसगाव परिसरात किमान १० हजारांहून अधिक स्थलांतरित कुटुंबे स्थायिक झाली असून, काहींनी स्वतःची घरे बांधली आहेत, तर काही भाड्याने राहतात.

स्थलांतरामुळे परिसरात काही किरकोळ गुन्हेगारी वाढल्याचेही दिसून आले आहे. मात्र, अल्पवयीन मुलीच्या हत्येने संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. ६ मार्चच्या रात्री पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेत असताना जमावाने संताप व्यक्त केला. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अनेक स्थानिकांनी त्यांच्या घरांसमोर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. हत्येच्या तपासात अशाच एका सीसीटीव्हीने महत्त्वाची भूमिका बजावली.

सरपंच रामनाथी डांगी यांनी सांगितले की, संशयास्पद हालचाली आढळल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिस व पंचायतीशी संपर्क साधावा. स्थानिक पोलिस ठाण्याने परिसरात नियमित गस्त वाढवावी. पंचायत सीसीटीव्ही बसवू शकत नसली तरी सरकारने हा खर्च उचलावा. त्यांनी पोलिसांना सार्वजनिक जनजागृतीसाठी जनता दरबार घेण्याची सूचनाही दिली, जेणेकरून नागरिक अधिक सतर्क राहतील. तसेच, पोलिसांनी भाडेकरूंच्या पार्श्वभूमीची तपासणी करण्यावर भर द्यावा, अशीही मागणी त्यांनी केली.

# शिक्षण संचालकांच्या विधानांवर आक्षेप

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ९** : सामाजिक कार्यकर्त्या सेसिल रॉड्रिग्ज यांनी शिक्षण संचालक शैलेश झिंगडे यांच्या शाळा सुरू करण्यासंदर्भातील विधानांवर टीका करत ती विरोधाभासी आणि पालकांच्या भावना दुर्लक्षित करणारी असल्याचा आरोप केला आहे.

रविवारी प्रसारित निवेदनात रॉड्रिग्ज म्हणाल्या की, ८ मार्च रोजी हेराल्ड वृत्तपत्रात शिक्षण संचालकांचा संदेश वाचल्यानंतर आम्हाला जाणवले की त्यांची विधाने विसंगत आहेत आणि गोव्यातील हजारो पालकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करणारी आहेत. राज्यभरात स्वाक्षरी मोहीम राबवली जात असून, त्याद्वारे एप्रिलमध्ये शाळा सुरू करण्यास मोठ्या प्रमाणावर विरोध नोंदवला जात आहे. हा विरोध लक्षात घेऊन प्रत्येक संबंधित विभागाला पालकांनी आपली भूमिका स्पष्टपणे कळवली आहे.

त्या पुढे म्हणाल्या की, या विरोधाला संपूर्ण गोव्यात मोठा प्रतिसाद मिळत असून, तीन दिवसांत १० हजाराहून हून अधिक पालकांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. शिक्षक संघटना, पालक-शिक्षक संघटनांचे (पीटीए) प्रमुख आणि मुख्याध्यापकांनीही आपली तक्रार मांडली आहे. या आंदोलनाकडे सरकार दुर्लक्ष करणार आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

रॉड्रिग्ज यांनी एससीईआर टी च्या संचालकांच्या ३ मार्च २०२५ रोजीच्या वक्तव्याचा संदर्भ देत सांगितले की, त्यांनी विद्यार्थ्यांना सुट्टी देण्याचा विचार असल्याचे स्पष्ट केले होते. तसेच, शिक्षण सचिवांनी पालकांच्या शिष्टमंडळाला विद्यार्थ्यांना किमान एक आठवड्याची सुट्टी दिली जाईल, असे आश्वासनही दिले होते. मात्र, आता शिक्षण संचालक स्वतःच या आधीच्या विधानांना खोडून काढत आहेत. हा हुकूमशाही प्रकार नाही का?

तसेच, त्या पुढे म्हणाल्या की, राज्य सरकारने हजारो विद्यार्थ्यांच्या भावना आणि मागण्यांकडे दुर्लक्ष करून लोकशाही मूल्यांना पायदळी तुडवले आहे. मागील शैक्षणिक वर्षात नववीच्या वर्गाने २२० दिवस पूर्ण केले होते आणि सर्व शैक्षणिक निकष

पान २ ▶

# शिणाणे उत्खननावरून मोरजी-शिवोली मच्छीमारांमध्ये तणाव

## मुख्यमंत्र्यांनी कल्पना, सूचना मागविल्या : २७ पासून अर्थसंकल्पिय अधिवेशन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ९** : मोरजी आणि शिवोली येथील पारंपरिक मच्छीमारांमध्ये शिणाणे उत्खननाच्या मुद्द्यावरून प्रादेशिक वाद निर्माण झाला आहे. रविवारी, शिवोलीमधील मच्छीमार बोटींसह मोरजी किनाऱ्यावर शिणाने काढण्यासाठी पोहोचले असता, स्थानिक मच्छीमारांनी त्यांना रोखले, यामुळे परिसरात तणाव वाढला.मोरजीतील पारंपरिक मच्छीमारांचा ठाम दावा आहे की, शिणाणे काढण्याची प्रक्रिया पारंपरिक पद्धतीनेच केली पाहिजे. शिणाणे काढायचे असल्यास पारंपरिक पद्धतीने डुबकी मारून ते गोळा करावे. आम्ही बोटींद्वारे हे उत्खनन होऊ देणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या दशकभरात प्रथमच शापोरा खाडीच्या काठावर मोठ्या प्रमाणात शिणाने आढळले आहेत. मात्र,




मोरजीतील मच्छीमारांना भीती आहे की बोटींचा वापर केल्यास परिसरातील पर्यावरणीय समतोल बिघडेल तसेच शिणाणे प्रजनन स्थळांवर विपरीत परिणाम होईल. स्थानिकांचा आरोप आहे की शिवोलीतील मच्छीमार शिणाणे गोळा करताना खाडीच्या तळातील मोठमोठे दगड काढून नेत आहेत, जे प्रजननासाठी महत्त्वाचे आहेत. तसेच, डायव्हिंग झोनमध्ये बोटींची उपस्थिती सुरक्षा धोक्याचे कारण बनू शकते, असेही स्थानिक मच्छीमारांचे म्हणणे आहे.

गुरुवारपासून सुरू झालेला हा वाद रविवारी अधिक चिघळला, कारण शिवोलीमधून आलेल्या मच्छीमारांची संख्या वाढली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी मोरजी सरपंच पवन मोरजे यांनी घटनास्थळी भेट देऊन दोन्ही गटांशी चर्चा केली. सरपंचांनी स्पष्ट केले की, शिणाने पारंपरिक पद्धतीने गोळा करणे आमच्या भागातील मच्छीमारांसाठी महत्त्वाचे आहे. बोटींचा वापर करून उत्खनन केल्यास भविष्यात शिणानेच्या प्रजोत्पादनाला धोका निर्माण होईल. स्थानिक रहिवाशांनी प्रशासनाला विनंती केली आहे की, हा वाद तातडीने सोडवण्यासाठी योग्य उपाययोजना करण्यात याव्यात, अन्यथा परिस्थिती अधिक चिघळण्याची शक्यता आहे.

शापोरा खाडीतील या वादातून पारंपरिक मासेमारी पद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबतचा संघर्ष अधोरेखित होतो. स्थानिक मच्छीमारांच्या मते, किनाऱ्यावरून पोहत जाऊन पारंपरिक पद्धतीने शिणाणे गोळा करणे अधिक सुरक्षित आणि पर्यावरणपूरक आहे. परंतु शिवोलीमधील व्यावसायिक मच्छिमारांचा यावर आक्षेप असून, ते बोटीचा वापर करून शिणाने काढण्यास इच्छुक आहेत.

सरपंच पवन मोरजे यांनी दोन्ही गटांना चर्चा करून समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले आहे. स्थानिकांनी प्रशासनाकडे यावर तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली असून, पारंपरिक मासेमारी पद्धतींचे जतन होण्यासाठी सरकारने योग्य ती पावले उचलावीत, असे मत व्यक्त केले आहे.